क्रमांक - कृबास ०८१२/प्र.क्र.३००(अ)११-स,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- १० एप्रिल, २०१४.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ आणि नियम १९६७**

ज्याअर्थी, लोकसभेच्या निवडणूकीचा कार्यक्रम सुरु आहे व या निवडणुकांत शासकीय यंत्रणा व्यस्त असणार आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम १४ (३)(ए) च्या तरतूदीनुसार टंचाई, दुष्काळ, पूर, आग किंवा इतर कोणतीही नैसर्गिक आपत्ती, पावसाळा, यामुळे किंवा राज्य विधानमंडळाचा किंवा संसदेचा किंवा एखाद्या स्थानिक प्राधिकरणाचा कोणताही निवडणूक कार्यक्रम आणि कोणत्याही बाजार समितीचा निवडणूक कार्यक्रम एकाच वेळी आल्यामुळे, किंवा राज्य शासनाच्या मते विशेष असेल अशा इतर कारणामुळे लोकहितास्तव कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूका पुढे ढकलण्याचे अधिकार राज्य शासनास आहेत;

आणि ज्याअर्थी लोकसभेच्या निवडणूका आणि राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे निवडणूकीचे कार्यक्रम एकाच वेळी येत असल्याने अशा कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूका घेणे लोकहितास्तव उचित होणार नाही अशी शासनाची खात्री झाली आहे.

त्याअर्थी, आता महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम १४ (३)(ए) च्या तरतूदीअन्वये प्राप्त अधिकारांनुसार शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

" राज्यातील ज्या कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांच्या बाबतीत या आदेशाच्या तारखेस नामनिर्देशनाचा टप्पा पूर्ण झालेला आहे, तसेच ज्या कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूका घेण्याबाबत मा.उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाने निश्चित असे आदेश दिलेले आहेत, अशा कृषी उत्पन्न बाजार समित्या वगळून इतर सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या संचालक मंडळांच्या निवडणूका दि.११.४.२०१४ पासून पुढील सहा महिन्यांच्या कालावधीसाठी पुढे ढकलण्यात येत आहेत."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सु. बा. तुंबारे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग.

प्रत:-

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे-३७.
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व विभागीय निबंधक, सहकारी संस्था. (पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत)
सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था. (पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत)
सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्या ( संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचेमार्फत)